दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित. ▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : ३०० वा ▶ शनिवार दि. २६ ऑगस्ट २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

### शरद पवारांबद्दल काँग्रेस-ठाकरे गटात संभ्रम नाही : पटोले



**मुंबई ।** शरद पवार हे ज्येष्ठ व अनुभवी नेते आहेत, अजित पवारांनी त्यांच्याशी घेतलेल्या भेटीनंतर परत यावे असे अजित पवारांना वाटत असावे. अजित पवारांचे मन वळवण्यात शरद पवार यांनाही यश आले असावे असेच शरद पवार यांच्या विधानावरून दिसत आहे, त्यामुळे अजित पवार पुन्हा स्वगृही परततील असे चित्र दिसत आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. भाजपाच्या विरोधात जे पक्ष लढण्यासाठी एकत्र येतील त्यांना सोबत घेऊन लढू असे देखील ते म्हणाले.

## न्यूज कॉलम

### टॉवरवरून पडल्याने मजूराचा मृत्यू

**नंदुरबार ।** तालुक्यातील भोणे येथील सुझलॉन कंपनीच्या टॉवरवरुन पडल्याने मजूराचा मृत्यू झाल्याची घटना सायंकाळच्या सुमारास घडली.याबाबत उपलब्ध माहितीनुसार, तालुक्यातील भोणे येथे उभारण्यात आलेल्या सुझलॉन कंपनीच्या टॉवरवर आज सायंकाळच्या सुमारास कंत्राटदाराकडून मेंटेनन्सचे काम सुरु होते. यावेळी एक मजूर विनासुरक्षा टॉवरवर चढला. मात्र, त्याचा अचानक तोल गेल्याने तो सरळ जमिनीवर कोसळला.

### शेत जमिनीच्या वादातून मारहाण

**धुळे ।** जांभोरा गुलतारा रस्त्यावरील शेत शिवारात प्रियंका पांडुरंग बहीरम ही कपडे धुत असताना तिला शेत जमिनीच्या वादातून मारहाण करण्यात आली. तिला भिल्या भावराम बागुल, काळू भावराम बागुल, दशरथ भावराम बागुल, लक्ष्मण दशरथ बागुल, सर्व. रा. बाभुळदे, ता. साक्री, जि. धुळे यांनी मारहाण, शिवीगाळ तसेच धमकावल्याचा आरोप केला आहे.

# अजित पवारांना पुन्हा संधी नाही : शरद पवार

**सातारा । प्रतिनिधी**

शरद पवारांनी आज सकाळी पत्रकार परिषदेत केलेल्या एका वक्तव्यामुळे अजित पवार पुन्हा माघारी फिरणार का? अशी चर्चा सुरू झाली होती. अजित पवार पक्षाचे नेते असल्याचं विधान शरद पवारांनी केलं होतं. त्यावरून राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण आल्यानंतर आता शरद पवारांनी अजित पवारांबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे शरद पवारांकडून दोन्ही पवार एकत्र येण्याच्या चर्चेवर पडदा टाकण्यात आल्याचं बोललं जात आहे.

सातारा येथे माध्यमांशी बोलताना शरद पवार यांना, अजित पवार परत आले, तर?, असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावर शरद पवार म्हणाले, प्रश्न असा आहे की, एकदा दोनदा एखाद्या व्यक्तीने एखादी भूमिका घेतली असेल आणि त्यानंतर ती दुरुस्त केली असेल, तर एक संधी द्यावी. त्यांना पक्षात वापस घेतलं.

तुम्हाला आठवत असेल, पहाटेचा शपथविधीला त्यामध्ये आमचे एक सहकारी त्यामध्ये सहभागी होते. त्यामुळे आधी निर्णय घेतला होता आणि त्याच्यानंतर जे काही झालं, ते योग्य नाही. आमच्याकडून योग्य काम झालं नाही. पुन्हा अशा रस्त्याने जायचं नाही, अशी भूमिका घेतल्यानंतर एक संधी द्यावी म्हणून त्यावेळी निर्णय घेतलेला होता. पण, संधी ही फार मागायची नसते आणि संधी सारखी द्यायची नसते. मागितली तरी द्यायची नसते, असे सांगत शरद पवारांनी अजित पवारांना आता परत घेणार नसल्याचे म्हटले आहे.



### काय म्हणाल्या होत्या सुप्रिया सुळे

भाजपसोबत सत्तेत सामिल झालेले उपमुख्यमंत्री अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात कुठलाही संभ्रम नसल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीनंतर ज्येष्ठ नेत्यांनी संभ्रम कायम ठेवला आहे. या संदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांना प्रश्न विचारण्यात आला होता. यावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवारच आहेत तसेच जयंत पाटील हेच महाराष्ट्राचे अध्यक्ष आहेत. आमच्यात कोणताही संभ्रम नाही. अजित पवार यांनी वेगळी भूमिका घेतली आहे. मात्र, त्याची तक्रार आम्ही विधानसभा अध्यक्षांकडे केली असल्याचा दावा सुप्रिया सुळे यांनी केला आहे.

### एकदा संधी दिली, आता नाही

यावेळी त्यांना तुम्ही अजित पवारांना पक्षात पुन्हा संधी देणार का? असा प्रश्न केला असता त्यांनी संधी मागली तरी द्यायची नसते, असे ठणकावून सांगितले. ते म्हणाले की, एकदा एखादी भूमिका घेतली असेल, करेक्शन केली असेल, तर ती संधी झाली. एकदा पहाटेचा शपथविधी झाला होता. तो दोन लोकांचा होता. त्यात आमचेही एक सहकारी होते. त्यावेळी आम्ही निर्णय घेतला होता.

### पवार राष्ट्रवादीत फूट पडली नसल्यावर ठाम

पवारांनी यावेळी पक्षात फूट पडली नसल्याचा पुनरुच्चारही केला. पवारांना यावेळी तुम्ही पक्षात फूट पडली नसल्याचा दावा करता, मग निवडणूक आयोगाकडे का गेलात? असा स्पष्ट प्रश्न करण्यात आला. त्यावर ते म्हणाले की, तुम्ही आमच्या पक्षात असाल आणि तुम्ही एखादी चुकीची भूमिका घेतल्यामुळे मी तुमच्यावर कारवाई केली असेल, तर त्याचा अर्थ पक्षात फूट पडल्याचा होत नाही, असे ते म्हणाले.

### राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली आहे : संजय राऊत

अजित पवार गटाने शरद पवारांची हकालपट्टी केली, याचा अर्थ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली असा होतो, असे वक्तव्य संजय राऊत यांनी केले आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, भाजपसोबत हातमिळवणी केली, हा पक्षद्रोह आहे. त्यामुळे आम्ही त्यांची हकालपट्टी केली. त्याचपद्धतीने राष्ट्रवादी काँग्रेसमधून एक गट फुटला आणि पक्षाच्या विचारधारेविरोधात भाजपशी हातमिळवणी केली. त्यानंतर त्या पक्षाने अजित पवारांसह काही प्रमुख लोकांची हकालपट्टी केली. याला फूट नाही म्हणायचे तर काय म्हणायचे? फूट आहे.

### संधी मागितली तरी द्यायची नसते

त्यानंतर त्यांनी माझ्याकडून जे झाले ते योग्य नव्हते, आता पुन्हा त्या मार्गाने जाणार नाही असे स्पष्ट केले होते. त्यामुळे त्यांना संधी देण्यात आली होती. पण संधी वारंवार मागायची नसते आणि मागितली तर ती द्यायची नसते, असे शरद पवार म्हणाले. त्यांच्या या भूमिकेमुळे अजित पवारांसाठी राष्ट्रवादीची कवाडे कायमची बंद झाल्याचे मानले जात आहे.

# धुळे जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहिर करा : आ.कुणाल पाटील

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व प्रशासनाकडे मागणी

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे जिल्हयात पावसाने दडी मारल्याने दुष्काळाचे संकट ओढावले आहे. शेत शिवारातील पिके करपली असून नदी नाले,तलाव कोरडे ठाक पडले आहेत. त्याचप्रमाणे पुरेसा व सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने जमीनीतील पाण्याची पातळी खालावली आहे. म्हणून धुळे जिल्हयात कोरडा दुष्काळ जाहिर करावा अशी मागणी पत्राव्दारे धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री तसेच धुळे जिल्हाधिकारी,जिल्हा कृषी अधिक्षकांकडे केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, धुळे जिल्ह्यात पावसाने दडी मारल्याने दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री तसेच धुळे जिल्हाधिकारी,जिल्हा कृषी अधिक्षकांकडे कोरडा दुष्काळ जाहिर करण्याबाबत मागणीचे पत्र दिले आहे. आ.पाटील यांनी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे कि,धुळे जिल्हयात सरासरीपेक्षा पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे. गेल्या अडीच महिन्यात साधारण ६० टक्क्यांपेक्षाही कमी पाऊस झाला आहे. तब्बल २० ते २५ दिवस पावसाचा खंड पडल्याने पिके करपू लागली आहेत. त्यामुळे शेतकर्यांच्या उत्पन्नात मोठी घट झाली आहे.

अत्यल्प पावसावर शेतकर्यांनी जुलै महिन्यात पेरणी केली. शेतकर्यांनी कर्जबाजारी होवून बी-बियाणे घेवून पेरणी केली. तुरळक पावसावर पिके जेमतेम तग धरत असतांना पुन्हा पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. आजही शेतकर्यांना मुसळधार पावसाची प्रतिक्षा आहे. पुरेशा प्रमाणात पाऊस नसल्याने भूगर्भातील पाण्याची पातळी खालविल्याने विहीरींनीही तळ गाठला आहे. नुकसानीचा तातडीने पंचनामा करुन भरघोस मदत जाहिर करावी. जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहिर करावा अशी मागणी आ.कुणाल पाटील यांनी केली आहे.

# धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याचे लिलाव सुरू

### मात्र नाफेड केंद्र नसल्याने शेतकरी नाराज

**धुळे । प्रतिनिधी**

केंद्र शासनाने कांदा निर्यात शुल्क वाढ केल्यानंतर धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याचे लिलाव ठप्प झाले होते. आता या ठिकाणी कांद्याचे लिलाव पुन्हा सुरू झाले आहेत. मात्र जिल्ह्यात एकही नाफेडचे खरेदी केंद्र नसल्याचा फटका शेतकऱ्यांना बसतो आहे. त्यामुळे धुळे जिल्ह्यात नाफेडमार्फत कांदा खरेदी केंद्र सुरु करावे, अशी मागणी जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.

गेल्या पाच ते सहा दिवसांपासून कांदा प्रश्न चांगलाच पेटला असून यामुळे नाशिकसह अनेक भागात आंदोलने करण्यात येत आहे. सुरवातीला केंद्र शासनाने कांद्यावर ४० टक्के निर्यात शुल्क लावले, त्यानंतर शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला. यावर उपाय म्हणून केंद्र शासनाने पुन्हा नाफेडमार्फ़त कांदा खरेदी करण्यात येईल अशी घोषणा केली. त्यानुसार नाशिक आणि अहमदनगरला दोन ठिकाणी नाफेडमार्फत २४१० रुपये दराने कांदा खरेदी सुरु झाली. मात्र केवळ २ लाख टन कांदा खरेदी करणार असल्याचे सांगितल्यानंतर नाशिक जिल्ह्यात शेतकऱ्यांनी पुन्हा आंदोलन पुकारले. दुसरीकडे धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी देखील केंद्र सरकारच्या या निर्णयाचा निषेध व्यक्त केला आहे.



राज्य शासनाने नाफेड मार्फत कांदा खरेदी करून प्रतिक्विंटल २ हजार ४१० इतका भाव देण्याची घोषणा केली आहे. मात्र धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ४०० ते २ हजार रुपये इतका भाव शेतकऱ्यांना मिळतो आहे. त्यामुळे धुळे जिल्ह्यात देखील नाफेडने खरेदी केंद्र सुरू करावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. कांदा लिलावात शेतकऱ्यांना अत्यंत कमी भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे, एकीकडे मागील वर्षी अवकाळी मुळे मोठ्या प्रमाणात कांदा पिकांचे नुकसान झालेले असताना आता धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याचे लिलावात अत्यंत कमी भाव मिळत असल्याने जिल्ह्यात नाफेडचे केंद्र सुरू करावे आणि त्या माध्यमातून शेतकऱ्यांना किमान २ हजार ५०० रुपये भाव कांद्याला मिळवुन द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

# नाफेड खरेदी केंद्राबाबत मंत्री भुजबळ यांची केंद्रीय वाणिज्य मंत्री गोयलांशी चर्चा

### राज्यात १६ ठिकाणी नाफेडची कांदा खरेदी केंद्र सुरु

**नाशिक । प्रतिनिधी**

राज्यात आतापर्यंत एकूण १६ ठिकाणी नाफेड कांदा खरेदी केंद्र सुरु करण्यात आली असल्याची माहिती केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांना दिली आहे. नाशिक जिल्ह्यात नाफेड कांदा खरेदी केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत काल मंत्री छगन भुजबळ यांनी केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली.

लासलगाव, पिंपळगाव बसवंत, विंचूर, अंदरसूल, मुंगसे, ताराबाद, नामपूर, मालेगाव, मनमाड, देवळा येथे खरेदी केंद्र सुरु करण्यात आले असून उद्या येवल्यात नाफेड कांदा खरेदी केंद्र सुरु करण्यात येणार आहे. त्यानुसार राज्यात आता एकूण १६ ठिकाणी नाफेडच्या वतीने कांदा खरेदी केंद्र सुरु असणार आहे.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने नाफेडच्या माध्यमातून २४१० रुपयांनी २ लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करत आहे. यासाठी राज्यात लासलगाव, विंचूर, अंदरसूल, पिंपळगाव बसवंत, मुंगसे, ताराबाद, नामपूर, मालेगाव, मनमाड, देवळा, तिसगाव, वैजापूर, आगर, पारनेर, व अहमदनगर येथे नाफेडच्या माध्यमातून कांदा खरेदी करण्यात येत आहे. ही केंद्रांची संख्या अधिक वाढविण्यात यावी याबाबत काल मंत्री छगन भुजबळ यांनी केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्याशी तसेच नाफेडचे व्यवस्थापक निखिल पाडाडे यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. त्यानुसार आजपासून येवल्यात नाफेडच्या वतीने कांदा खरेदी केंद्र सुरु करण्यात येणार असून राज्यात १६ ठिकाणी नाफेडच्या वतीने कांदा खरेदी केंद्र सुरु झाली आहेत. त्यामुळे कांदा उप्तादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## ज्येष्ठ अभिनेते मिलिंद सफई यांचे निधन

**मुंबई ।** ज्येष्ठ अभिनेते मिलिंद सफई यांचे शुक्रवारी सकाळी निधन झाले. ते गत काही वर्षांपासून कर्करोगाचा सामना करत होते. त्यांनी शुक्रवारी सकाळी १०.४५ वा. अखेरचा श्वास घेतला. मिलिंद सफई यांनी अनेक लोकप्रिय मराठी चित्रपट व मालिकांमधून प्रेक्षकांवर आपल्या अभिनयाची छाप सोडली होती. मिलिंद सफई मराठी सिनेसृष्टीतील एक आघाडीचे कलावंत होते. गत काही वर्षांपासून ते कर्करोगाचा सामना करत होते. त्यांच्यावर उपचारही सुरू होते. पण शुक्रवारी सकाळी १०.४५ च्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ज्येष्ठ अभिनेते जयवंत वाडकर यांनी फेसबूक पोस्टद्वारे त्यांच्या निधनाची माहिती दिली.

# पैशांच्या वादातून तरुणाचा निर्घृण खून

**साक्री । प्रतिनिधी**

किरकोळ कारणावरून डोक्यात लोखंडी पहारीने वार केल्याने गंभीर जखमी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. याप्रकरणी हॉटेल आठवणचा मालक मुकुंद पाटील याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे.

मारहाणीची घटना हॉटेल आठवणमध्येच घडली होती. मयताचे वडिल अशोक रामराव खैरनार (रा. विटाई) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शेत नांगरणीच्या राहिलेल्या पैशांवरुन त्यांचा मुलगा ललीत याचा वाद मुकुंदा गुलाबराव पाटील याच्याशी झाला. यावेळी मुकुंदा याने संतापाच्या भरात लोखंडी पहारीने ललीतच्या डोक्यावर वार केला. यात तो गंभीररित्या जखमी झाला. ही घटना २३ ऑगस्ट रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास घडली. गंभीर जखमी ललीतला उपचारार्थ धुळ्यात भरती करण्यात आले होते. काल तो उपचारादरम्यान दगावला. या फिर्यादीवरुन हॉटेल आठवणचा मालक मुकुंद पाटील (रा. बेहेड, ता. साक्री) याच्याविरुद्ध भादंवि कलम ३०२, ५०४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी संशयिताला अटक केली आहे.


## १३ वे पुण्यस्मरण



प्रेम देऊनी जवळ केले सर्वांना,
न उरली साथ आम्हाला,
आठवण येते क्षणाक्षणाला,
कल्पनेतही नव्हते तुमचे जाणे,
अधुरे राहिले जीवन गाणे,
आता फक्त एकच उरले
तुमच्या स्मृतींना श्रद्धांजली वाहणे,
तुमच्या पावन स्मृतींना
आमची भावपूर्ण आदरांजली.

**स्व.शोभना (रत्ना) प्रकाश लगडे**

जन्म दि.०२/०७/१९५५ मृत्यू दि.२६/०८/२०१०

**शोकाकुल**

प्रकाश म. लगडे (पती)
मनोज प्र.लगडे (मुलगा)
संदीप प्र.लगडे (मुलगा)
सागर वि.लगडे (पुतण्या)
कु.गुंजन मनोज लगडे (नात)
प्रकाश दगडू जाधव (व्याही)
चंद्रकांत विठ्ठल जाधव (व्याही)
केशव नारायण कापसे (भाऊ)
सौ.नंदा मनोज लगडे (सून)
सौ.सायली संदीप लगडे (सून)
सौ.पूजा सागर लगडे (सून)
श्रीमती उषाबाई ध.चंदनकर (सून)
सौ.विमल प्र.जाधव (व्याहीणबाई)
सौ.साधना चं. जाधव (व्याहीणबाई)


# पोलीस अधीक्षक साहेब थोडं धुळे शहराकडे लक्ष द्या हो!

### भयभीत नागरिकांचे साकडे

धुळे जिल्हा हा शिस्त प्रिय आहे पण गेल्या काही दिवसापासून जिल्ह्यात चोरी, घरफोडीचे गुन्हे नित्याचेच झाले आहे. धुळे शहरातील नव्हे तर जिल्ह्यातील नागरिक खरोखर सुरक्षित आहेत का ? असा प्रश्न आता जिल्ह्यातील सामान्य नागरिक विचारु लागले आहेत. जिल्हयात आणि धुळे शहरात दररोज घडणारे घटनाक्रम पोलिसांसमोर आव्हान उभे करणारे आहेत. अवैध व्यवसाय फोफावला अतांना दिवसाआड गावढी कट्टे सापडत असून गेल्या तीन दिवसात शहरात पडलेले तीन दरोड्यांमुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

ग्रामीण भागात गेल्या महिनाभरात सर्वत्रच लहान-मोठया चोऱ्या होत आहेत चोरी लूटमार दरोडा अशा घटनांत मोठी वाढ झाली आहे. भुरट्या चोरांना आळा घालण्यासाठी यापूर्वीच्या रेकॉर्डवरील चोरट्यांवर नजर ठेवली जायला हवी. तरच त्यांच्याकडून होणाऱ्या चोऱ्या रोखता येतील. ज्या ठिकाणांवर अलिकडे चोऱ्या झाल्या आहेत, त्यांच्या तपासासाठीही प्रयत्न वाढवायला हवेत. पोलिस आणि नागरिकांनी संयुक्तपणे उपाययोजना केल्यास चोऱ्यांना आळा बसेलत सेच यादृष्टीने प्रयत्न होणे अपेक्षित आहेत. जिल्ह्यामध्ये दुचाकी चोरीला जाण्याचे सत्र काही थांबायला तयार नाही परिणामी या चोरट्यांना पकडण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान असून, नागरिकांमध्येही मोठी दहशत निर्माण झाली आहे.



शोध बातमी
पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.7057011126

### चोरट्यांचा खेळ कधी थांबणार?

**सर्वसामान्यांच्या घरफोड्या दुचाकी चोरीच्या वारंवार घडणाऱ्या घटनांवर कधी अंकुश लागणार सक्रीय असलेल्या या टोळीच्या कधी मुसक्या आवळल्या जाणार सतत कोठे ना कोठे घरफोडी मोटरसायकल चोरी अश्या घटना घडत आहेत. चोरट्यांचा खेळ कधी थांबणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे दुचाकी चोरावर अंकुश लावण्याचे पोलीसांसमोर आव्हान असून ते कितपत यशस्वी ठरतात हे पाहण्याची जनतेला उत्सुकता आहे. दुचाकीधारक बाहेर निघाल्यानंतर हॉटल, दवाखाने, वदळीच्या व रहदाराच्या ठिकाणी आपली वाहन चोरी जाते की काय अशी भिती त्यांच्या मनामध्ये निर्माण झाली आहे.**

### पोलिसांनी वाढवावे पेट्रोलिंग

**उच्चभ्रू लोकवस्ती असलेल्या देवपूर भागात घरफोड्या वाढल्याने रहिवासी धास्तावले आहेत. याबाबत पोलिसांनी लक्ष घालून पेट्रोलिंग वाढविले पाहिजे. नागरिकांनीदेखील संशयास्पद व्यक्तींची माहिती पोलिसांना देण्याची गरज आहे. त्यामुळे असे प्रकार थांबू शकतील.**

**'त्यांची' केली जावी चौकशी**

**शहरात गेल्या काही वर्षांत चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. रोजच होणाऱ्या घटनांमध्ये स्थानिक पोलिस स्टेशनला चोरीचे गुन्हे दाखल केले जातात. गुन्हे दाखल असणाऱ्यांची चौकशी केली पाहिजे.**


## धरसोड कायम..!

कांदा साठवणीसाठी चाळीचा पर्याय अनेकदा भुर्दंड देणाराच ठरतो. गारपीट, हवामानातील बदल यामुळे चाळीत ठेवलेला कांदा हातचा गेला, असे अनेकदा घडले. कांद्यावर ४० टक्के निर्यात शुल्क आकारण्याचा केंद्र सरकारचा निर्णय कांदा उत्पादक शेतकर्यांना अस्वस्थ करणारा ठरला आहे. संतप्त शेतकर्यांनी अनेक ठिकाणी कांद्याचे लिलाव रोखले. यानंतर दोन लाख मेट्रिक टन कांदा खरेदीचा निर्णय जाहीर करण्यात आला खरा; पण मूळ प्रश्नाचे उत्तर यातून मिळालेले नाही. सरकारच्या धोरणातील विसंवाद या निमित्ताने पुढे आला आहे. शेतकर्यांचे हित आणि ग्राहकांचेही समाधान, हा समतोल अपेक्षित असतो. मात्र, तो साधण्याच्या प्रयत्नात सरकारच पेचात अडकलेले दिसते. याचे कारण दूरदृष्टी ठेवून निर्णय न घेण्याची मानसिकता! यावर्षी टोमॅटोच्या दराने सर्वसामान्यांना चटका दिला. रोजच्या वापरातील भाज्या, फळभाज्या यांचे दर एका मर्यादेपलीकडे गेल्यास सामान्य ग्राहकांची होरपळ होते. दर वाढले की त्याचा समाधानकारक फायदा कष्टकरी शेतकर्यांच्या वाट्याला जातो, असेही घडत नाही. टोमॅटोप्रमाणे कांद्याच्या दराचा भडका उडू नये यासाठी केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर ४० टक्के शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला. रब्बी हंगामातील कांदा बाजारात येईपर्यंत हा निर्णय राहणार आहे. आता बाजारात येत असलेला कांदा उन्हाळी हंगामातील आहे. यावर्षी कांद्याचे उत्पादन गेल्यावर्षीच्या तुलनेत अधिक असल्याचा अंदाज आहे. गेल्यावर्षी २६.६४ दशलक्ष टन कांद्याचे उत्पादन झाले. यावर्षी उत्पादनात १६.८१ टक्के वाढ अपेक्षित आहे. कांद्याच्या निर्यातीवरील शुल्क ४० टक्के वाढविणे याचाच अर्थ निर्यात रोखणे. अशावेळी शेतकर्यांना पुन्हा मातीमोल भावाने कांदा विकावा लागणार, हे स्पष्ट होते. कांदा उत्पादनात महाराष्ट्र आघाडीवर असल्याने निर्यात शुल्कातील वाढीचा सर्वाधिक फटका राज्यातील शेतकर्यांना बसणार! देशातील कांदा निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा ७० टक्क्यांहून अधिक आहे. साहजिकच राज्यात ठिकठिकाणी कांदा उत्पादक शेतकर्यांच्या आंदोलनाला सुरुवात झाली. कांदा नाशवंत शेतमाल आहे. वेळेत विक्री आणि निर्यात झाली नाही तर शेतकर्यांची सर्व मेहनत पाण्यात जाते. निर्यात शुल्कात अवाजवी वाढ करताना केंद्र सरकारने किमान ते भान ठेवले होते किंवा नाही? निर्यात शुल्कात वाढ होताच उरणच्या जेएनपीटी बंदरात निर्यातीसाठी आलेला चार हजार टन कांदा कंटेनरमध्ये पडून सडण्याच्या मार्गाला लागला. असे कोट्यवधींचे नुकसान मनमानी कारभाराचेच उदाहरण. कांदा उत्पादक शेतकरी संकटात असताना श्रेयासाठी लढाई अपेक्षित नाही; पण अलीकडच्या काळात महाराष्ट्राचे चित्रच बदलून गेले त्याला काय करणार? निर्यात शुल्क वाढीचा फटका बसून राज्यातील वातावरण आणखी अस्वस्थ होणार, हे माहीत असल्याने कृषी मंत्री धनंजय मुंडे केंद्रीय वाणिज्य आणि ग्राहक संरक्षण मंत्री पियुष गोयल यांच्या भेटीला गेले. त्यांनी चर्चेची फलनिष्पत्ती जाहीर करेपर्यंत जपानमधून ट्विट करीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन लाख मेट्रिक टन कांदा खरेदीचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्याची माहिती दिली. यातून कांदा उत्पादक शेतकर्यांना थोडा दिलासा मिळणार असला तरी निर्यात शुल्कासंदर्भात फेरविचार झालेला नाही. म्हणूनच, सरकार केवळ ग्राहककेंद्री विचार करते, शेतमाल पिकवणार्यांचा विचार होत नाही, अशी टीका शेतकरी संघटनांचे नेते करीत आहेत. सामान्य ग्राहकांना योग्य किमतीत शेतमाल मिळणे आणि त्याचवेळी शेतकर्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळणे आवश्यक आहे. कांद्याच्या प्रश्नाकडे सर्वांगीण दृष्टीने पाहायला हवे. त्याऐवजी दादा भुसे यांच्यासारखे मंत्री असंवेदनशील आणि तेवढीच तर्कदुष्ट विधाने करताना दिसले. कांदा खाल्ला नाही तर काय बिघडते? असा त्यांचा सवाल होता! केंद्रीय मंत्री डॉ. भारती पवार यांनी निर्यात शुल्क वाढीचे समर्थन केले, तर भाजपचेच खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी हा निर्णय शेतकर्यांवर अन्याय असल्याची टीका केली. म्हणजे सरकारच्या निर्णयावर भाजपमध्येही एकमत नाही. केंद्रातील सत्तेसाठी महाराष्ट्र महत्त्वाचा असल्याने आंदोलनाची धग वाढताच कांदा खरेदीचा निर्णय झाला. शेतकर्यांसाठी ती तात्पुरती मलमपट्टी ठरेल.

# चांद्र मोहिमेनंतर आता लक्ष सूर्याकडे

**भारताची महत्त्वाकांक्षी चांद्रमोहीम यशस्वीपणे पार पडली आहे. 'चांद्रयान-३' हे चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ सुरक्षितपणे लँड झाले. त्यानंतर चंद्राच्या या भागात सॉफ्ट लँडिंग करणारा भारत हा पहिलाच देश ठरला. हे यश म्हणावे तितके सोपे नव्हते. त्यासाठी शास्त्रज्ञांनी अपार कष्ट, प्रचंड मेहनत आणि कमालीचा आत्मविश्वास बाळगून ही मोहीम आखली आणि यशस्वी केली. या मोहिमेकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विशेष लक्ष होते. या मोहिमेसाठी आवश्यक ते सर्व सहाय्य सरकारतर्फे पुरविण्याचे आदेश त्यांनी दिले होते. तसेच शस्त्रज्ञांनाही त्यांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिले. चांद्रयान-३चा हा प्रवास खरं तर चांद्रयान-१च्या यशानंतरच सुरू झाला होता.**






पहिल्या चांद्रयानाने चंद्रावर पाण्याचे अंश असल्याचा शोध लावला होता. त्याचाच अधिक अभ्यास करण्यासाठी चंद्राच्या पृष्ठभागावर जाणे आवश्यक होते. त्यामुळे चांद्रयान-२ मोहीम आखण्यात आली. दुर्दैवाने चांद्रयान-२ हे चंद्रावर सॉफ्ट लँडिंग करू शकले नाही. मात्र त्यामुळे इस्रोचे वैज्ञानिक खचले नाहीत. 'चांद्रयान-२' हे चंद्रावर क्रॅश झाले असले, तरी ते चंद्राच्या कक्षेत यशस्वीपणे पोहोचले होते. त्यामुळे इस्रोच्या वैज्ञानिकांना हुरूप आला होता. म्हणून लगेचच तिसऱ्या चांद्रयान मोहिमेची तयारी सुरू करण्यात आली. सॉफ्ट लँडिंग आणि चंद्राच्या जमिनीचा अभ्यास, हेच लक्ष्य डोळ्यांसमोर ठेऊन नव्याने चांद्रयानाची निर्मिती सुरू झाली. 'चांद्रयान-२' मोहिमेच्या अपयशातून इस्रोच्या शास्त्रज्ञांनी धडा घेतला. त्यामुळेच 'चांद्रयान-३'चे मॉडेल हे सक्सेस बेस्ड नाही, तर फेल्युअर बेस्ड होते. मागील चांद्रयान हे शेवटच्या काही मिनिटांमध्ये क्रॅश झाले होते. त्यामुळे लँडिंगच्या या फेजसाठी चांद्रयान-३मध्ये विशेष काळजी घेण्यात आली. चांद्रयानाला पृथ्वीच्या कक्षेतून चंद्राच्या कक्षेत नेणे ही गोष्ट दुसऱ्या मोहिमेत देखील यशस्वी झाली होती. भारताच्या या यशाचे संपूर्ण श्रेय हे नक्कीच पूर्णपणे इस्रोच्या वैज्ञानिकांचे आहे. या यशात भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे (इस्रो) अध्यक्ष एस. सोमनाथ यांच्यासह 'चांद्रयान-३' मोहिमेचे संचालक मोहन कुमार, रॉकेट संचालक बीजू सी. थॉमस यांचा मोठा वाटा आहे. 'इस्रो'च्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, 'चांद्रयान-३' या मोहिमेत ५४ महिला अभियंत्या आणि शास्त्रज्ञांचा सहभाग होता. 'इस्रो'च्या वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या केंद्रातील विविध विभागांत त्या अधिकारीपदावर काम करीत आहेत. भारताच्या या चांद्रयान मोहिमेकडे संपूर्ण देशासह अवघ्या जगाचे लक्ष लागले होते. रशियानेही लुना २५ या मोहिमेच्या माध्यमातून चंद्राच्या पृष्ठभागावर उतरण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्यात तांत्रिक बिघाड झाला आणि त्यांची ती मोहीम अपयशी ठरली. अशात भारताची चांद्रयान मोहीम ही यशस्वी होईल, असा विश्वास इस्रोने व्यक्त केला होता. त्यानुसार ही मोहीम यशस्वी झाली आहे. आम्ही चांद्रयान-२ च्या अपयशातून खूप काही शिकलो आहोत, असे वैज्ञानिकांनी स्पष्ट केले होते. या ऐतिहासिक कामगिरीसाठी जगभरातून भारतावर कौतुकाचा वर्षाव झाला. 'नासा'चे डमिनिस्ट्रेटर बिल नेस्लन, ब्रिटिश स्पेस एजन्सी, युरोपीय स्पेस एजन्सी अशा सर्वच दिग्गज संस्थांनी आणि कित्येक देशांनी 'इस्रो'चे आणि देशाचं अभिनंदन केले.'चांद्रयान-३ च्या 'विक्रम'चे चंद्रावर यशस्वी अवतरण होताच देशभरात उत्साहाचे वातावरण संचारले. ठिकठिकाणी फटाक्यांची आतषबाजी झाली. शालेय विद्यार्थ्यांनीही शाळांच्या आवारात ढोल-ताशे वाजवत आनंदोत्सव साजरा केला. चंद्रयान-३ मोहीम यशस्वी होण्यासाठी सकाळी विविध मंदिरांमध्ये काहींनी साकडे घातले होते. त्यानंतर सायंकाळी चांद्रयान-३ विक्रमचे यशस्वी लॉन्डिंग झाल्याची आनंदाची वार्ता कानी पडताच सर्वत्र जल्लोष सुरू झाला. मिठाई वाटण्यात आली. या वर्षी जून महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अमेरिका दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी आर्टेमिस करारांवर स्वाक्षरी केली. यानंतर आर्टेमिस अकॉर्ड्समध्ये सहभागी होणारा भारत २६वा देश झाला. त्यासोबतच, भारताचा नासासोबत भविष्यातील संयुक्त मोहिमांसाठीही करार झाला आहे. अमेरिकेची स्पेस एजन्सी नासाने जगभरातील कित्येक देशांसोबत आर्टेमिस करार केला आहे. त्यानुसार, अंतराळ संशोधनाबाबत काही गाइडलाइन्स सेट करण्यात आल्या आहेत. भविष्यातील अंतराळ मोहिमा अधिक सुरक्षित करण्यासाठी हा करार महत्त्वाचा आहे. यानुसार, अंतराळात अडकलेल्या कोणत्याही देशाच्या अंतराळवीर किंवा उपग्रहांना मदत करण्यासाठी इतर देश प्रतिबद्ध आहेत. यासोबतच, अंतराळ मोहिमा पारदर्शक ठेवणे आणि मिळालेलं संशोधन शेअर करणे हादेखील याचा भाग आहे. त्यामुळेच भारताची चांद्रयान-३ मोहीम यशस्वी झाल्याने त्याचा फायदा कित्येक देशांना होणार आहे. भविष्यात अंतराळ मोहिमा राबवण्याच्या आणि चंद्रावर मानव पाठवण्याच्या तयारीत असणाऱ्या देशांसाठी चांद्रयान-३ने गोळा केलेली माहिती उपयोगी असणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या ब्रिक्स परिषदेसाठी दक्षिण आफ्रिकेत आहेत. त्यांनी तेथूनच या ऐतिहासिक यशासाठी भारतीयांचे आणि इस्रोचे अभिनंदन केले. अखंड भारतासाठी हा महत्त्वाचा आणि नवी चेतना देणारा ठरणारा असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. काही दिवसांतच इस्रोकडून पहिली 'सूर्य मोहीम' लाँच करण्यात येणार आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था आता अवकाशात उपग्रह पाठवून सूर्यावर २४ तास नजर ठेवणार आहे.

# शिक्षणाच्या जाहिरात बघताय सावधानता बाळगा!

अगं, माधवी किती दिवस झाले तू भेटलीच नाहीस; कुठे आहेस, कुठे? नीताने भाजी घेता घेता भेटलेल्या आपल्या मैत्रिणीला विचारले. नीता, तुला तर माहितीच आहे, सईची बारावी आहे. मी अगदी तिचे वेळापत्रकच बनविले आहे. दिवसभर तिचे कोचिंग क्लास असतात त्यानुसार खाणे-पिणे. मला वेळच मिळत नाही. एकदाची तिला टॉप ३ इंजिनीरिंग कॉलेजपैकी एका कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळाली की सुटले बाई मी. ती कॉलेजेस म्हणजे १००% नौकरीची खात्रीच बघ! दहावीच्या सुट्टीपासून तोच एक ध्यास आहे सगळ्यांचा. नीताने एका दमात सांगितले. हे असे संवाद आपल्या परिचयाचे आहेतच. दिवसेंदिवस शैक्षणिक क्षेत्रातील वाढती स्पर्धा आणि आव्हाने त्यामुळे दावणीला बांधलेले पालक आणि पाल्य हे चित्र घरोघरी दिसते आहे.

कोरोना या जागतिक महामारीमुळे मधली दोन वर्षे सारे काही ऑनलाइन असे चित्र होते. त्यामुळे शैक्षणिक संस्थांचे स्वरूपच पालटले. पूर्वी आपल्याला आपल्या शहरातील नावाजलेली शाळा, कॉलेज यांची तोंड ओळखीतून माहीत असायची. अभ्यासक्रमही ठरावीकच होते. आता बदलत्या काळानुसार अभ्यासक्रमातही विविधता आली. ऑनलाइन आणि ऑफलाइन संस्था निर्माण झाल्या. साहजिकच त्यांच्यातही नामांकनाची स्पर्धा निर्माण झाली. थोडक्यात शिक्षण क्षेत्र ही सेवा न राहाता व्यवसाय झाला आहे. अर्थातच व्यवसाय म्हटले की, ग्राहक आला आणि त्यापुढे जाता ग्राहकाला आकर्षित करणाऱ्या जाहिरातीही ओघाने आल्याच. सध्या शिक्षणसेवा हा देशातील दुसऱ्या नंबरचा आर्थिक उलाढाल असलेला व्यवसाय आहे. ऑनलाइन तंत्रज्ञान वापरून शिक्षण देणाऱ्या संस्था एव्हढ्या आहेत की, साहजिकच विद्यार्थ्यांना आकर्षित करून घेण्यासाठी त्यांच्यात चढाओढ आहे. त्यामुळे त्यांनी दिशाभूल केलेल्या जाहिरातींचे प्रमाण खूप आहे. जाहिरातदार पालकांची आणि मुलांची मानसिकता, त्यानुसार होणारी वर्तणूक त्यांची आगतिकता अचूक हेरतात. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून शिक्षण हे सर्वोच्च उल्लंघन करणाऱ्या जाहिरात क्षेत्रांपैकी एक आहे. ASCI (The Advertising Standards Council of India) च्या वार्षिक तक्रार अहवाल २०२२-२०२३ नुसार एकूण जाहिरातींपैकी १३.८% जाहिराती ह्या शिक्षण क्षेत्रातील




-ASCI च्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणाऱ्या आहेत आणि शिक्षण क्षेत्राचा त्याबाबतीत दुसरा क्रमांक लागतो.

शिक्षण क्षेत्राची वाढती व्यापकता लक्षात घेऊन ASCI ने काही नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

शैक्षणिक संस्थांनी कुठलेही दावे करताना त्याला सबळ पुरावे देणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ शैक्षणिक संस्था त्या नंबर १ आहेत. याचा नेमका अर्थ काय? कशावरून? त्यांच्याकडे त्या शहरातील उत्तम शिक्षक आहेत का?, त्यांना काही पुरस्कार मिळाले असतील, तर त्याची सर्टिफिकेट्स, त्यासाठी झालेले सर्वेक्षण, त्यासाठी वापरात आलेली प्रश्नावली हे सादर करू शकतील का? हे प्रश्न ग्राहक म्हणून आपल्याला पडायला हवेत.

जेव्हा एखादी शैक्षणिक संस्था १००% जॉबची खात्री असे जाहीर करते तेव्हा त्यांनी त्याखाली भूतकाळातील नोंदी भविष्यातील खात्री देऊ शकत नाहीत, असे अस्वीकारण लिहिणे/दाखवणे आवश्यक आहे.

विद्यापीठांसह, महाविद्यालये, शाळा, कोचिंग क्लासेस आणि एजुटेक प्लॅटफॉर्म ह्यांनी सगळ्या विद्यार्थ्यांना एकाच तराजूत (स्टिरिओटाइप) तोलता कामा नये. जाहिरात करताना जाहिरातदारांनी आणि वाचताना ग्राहकांनी हा मुद्दा लक्षात घ्यावा. उदाहरणार्थ चष्मा लावणारी मुले म्हणजे हुशार मुले असे अधोरेखित होऊ नये.

जाहिरात ही मुलांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करणारी नसावी. एखाद्या जाहिरातीमध्ये शालेय विद्यार्थी अभ्यासासाठी झोपेशी तडजोड किंवा जेवणाच्या चुकीच्या सवयी अमलात आणताना दाखवले जाते; परंतु परिणामी आरोग्यासंबंधी हानिकारक सवयी लागू शकतात.

कमी मार्क मिळवणे म्हणजे अपयश असे दर्शवू नये किंवा अपयश आले म्हणून त्याला किंवा तिला शिक्षक, मित्र, पालक हिणवत आहेत आणि त्यामुळे ती मुले निराश किंवा दुखी आहेत, असे दाखवू नये. ही नकारात्मकता जाहिरातीत नसावी.


जाहिरातीमध्ये तातडीची निकड नसावी. उदाहरणार्थ जर वेळेत ॲडमिशन नाही घेतली तर विद्यार्थ्यांचे नुकसान होईल अशी भीती पालक आणि विद्यार्थी या दोहोंमध्ये निर्माण केलेली नसावी.

जाहिरात करताना मुलगा-मुलगी असा भेदभाव नसावा. काही विषय ही फक्त मुलांची किंवा मुलींची मक्तेदारी असे दाखवू नये.

जाहिरात करताना अतिशयोक्ती टाळावी. उदारणार्थ काही शैक्षणिक ॲप असा दावा करतात की, त्यांच्या काही अभ्यासक्रमांमुळे एकाग्रता वाढते. असेच काही नसते. आपल्याला जे आवडते ते करूनही एकाग्रता वाढते.

पुढे येणारे युग हे जाहिरातींचे आहे हे आपण मान्य केले आहे आणि त्याची माध्यमे पण बदलत जाणार आहेत तेव्हा जाहिरातींकडे सजगपणे बघणे आणि मुलांनाही त्याबद्दल डोळस बनवणे आपले ग्राहक म्हणून कर्तव्य आहे. मित्रमैत्रिणींच्या दबावाला बळी न पडता मुलांना आपली गरज ओळखून शैक्षणिक संस्थांची सत्यासत्यता पडताळून मगच पुढचे पाऊल उचलण्यास शिकविले, तर आपण आर्थिक आणि मानसिक फसवणुकीपासून सुरक्षित राहू शकू.

## शब्दकोडे-१६०



**आडवे शब्द**

३. मैत्रीण ७. छोटे नगर ९. जमाखर्चाचे सरकारी नियोजन १०. सनसनाटी १३. उत्तराधिकारी १४. वाम, दुय्यम १५. खेळात, युद्धात या दोन्हीपैकी एकाचा स्वीकार करावाच लागतो १७. तृण १९. चोप २०. छोटा दगड २१. स्वामी २२. नवीन, ताजा २३. धमनी २४. तळे २५. मनुष्य २७. दत्ताची मुखे २८. हिरमोड ३०. पाणी ३१. माळ ३३. अंगणात केलेले पाण्याचे शिंपण ३४. स्वच्छ ३५. कष्टमय ३६. लोभ ३८. मोलकरीण ३९. त्वचा ४०. लोभ, वखवख (हिंदी) ४३. वधू ४५. भस्म ४६. फिरणे ४८. भेकड ५१. दफनभूमी ५२. पती ५४. मिठी ५५. उन्मत्तपणा उपयोगाचा नाही हे सांगणारी एक म्हण- '----- खाली' ५६. वाईट सवय ५८. आश्चर्य ६०. ---- महावीर-जैनांचे तीर्थंकार ६३. मोठेपणा, अष्टसिद्धीपैकी एक ६५. जसा ६७. व्यभिचारी ६८. धष्टपुष्ट ६९. अंत:करण ७१. बातमी, वार्ता ७२. पूर्ण भरतीची वेळ ७३. सौम्य धोरण ७४. लटका, खोटा ७७. चक्र ७८. पुढारी ७९. आसक्ती नसलेला ८०. अवाक्षर ८१. कापसाचे बी ८२. गणपती

**उभे शब्द**

१. अस्सल 'पुणेरी' पेठ २. वस्त्र ३. सुकुमार ४. अग्नी ५. भावनाप्रधान ६. अपमान ८. मिरवणूक १०. अफूचे बी ११. मोठा (हिंदी) १२. हात १६. मराठीत व्हिटॅमिन १७. सर्दी झाल्यावर घ्यायचा चहा १८. काया १९. विचार २१. शुभ्र २२अ. बाजू घेणे २३. वस्तू, पर्वत २४. शाप २६. बटाट्याचा लोकप्रिय पदार्थ २९. मोडणे ३०. वजनदार ३२. कूपमंडूकांचा आवाज ३५. दुष्ट ३७. रान ३९. शर्करा ४१. पावसाची झड ४२. ताकात केली जाणारी पालेभाजी ४४. पुन्हा पुन्हा ४५. उसाचा घट्ट रस ४६. अग्नी ४७. ख्रिस्ती भिक्षुणी ४९. काढलेले कुबड ५०. देव्हाऱ्यतील कृष्णमूर्ती ५१. नवरदेवाची धाकटी बहीण ५३. भूपाळीतील कृष्ण ५७. टिकाव, टिकून राहणे ५९. शेवट ६१. मोठेपणा ६२. पुर ६४. मोकळा ६६. खोटे बोलणे ६७अ. प्रसिद्धी, कीर्ती ७०. प्रजा ७२. कसदार ७५. काव्य करणारा ७६. चाकू ७८. प्रामाणिकपणा

## शब्दकोडे १५९ चे उत्तर

**आडवे उत्तर -**

२.बातमीदार ६.थकवा ९.गो १०.विनामूल्य ११.खडाजंगी १३.रुसवा १५.कढ १७.हेर १८.गतप्राण १९.गीत २१.हल २२.दायित्व २३.खीळ २४.नश्वर २५.नीरवता २७.रत २८.तरबेज ३१.कायम ३२.पथ ३३.दिल्ली ३४.कामला ३७.मरामारी ४०.नकार ४२.जिकीर ४४.वाखणाणी ४६.क्ष किरण ४७.बारव ४८.वचक ५०.निखारा ५२.वरण ५३.वनिता ५४.बाणेदार ५६.जखमी ५७.सदाशिव ५८.सीमा ५९.जामात ६१.नवमी ६३.टापू ६५.थारा ६७.हाव ६८.राग ७१.तर्क ७२.तिढा ७३.घन ७५.रास ७७.जनगणना ७९.अवगत ८०.लकब ८१.कमी ८२.रूढी ८३.अंग ८४.जरा ८५.अस्ताचल

**उभे**

१.अनाकलनीय २.बाल्य ३.मीठ ४.रखरखीत ५.भुजंग ७.करुण ८.वास १०अ.मूढ १२.गीतकार १४.वागीश्वरी १६.दयिता २०.तर २२.दाव २६.रममाण २७.रथ २८.तल्लीन २९.बेकार ३०.जम ३१.कालवा ३२.परीक्षक ३५.लाजिरवाणे ३६.शेर ३८.राणीव ३९.निरवानिरव ४१.कारखानदार ४३.कीव ४५.खातरजमा ४९.चपखल ५१.आरमार ५४.बावटा ५५.दासी ५९.जागतिक ६०.तथा ६१.नवरा ६२.मीरा ६४.पूतना ६६.राघव ६९.गजबज ७०.सुगम ७४.नगर ७६.सलग ७८.सामील ७९.अढी ८१.कच

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### चांदवडला सहा घरफोडया, टोळी गजाआड

**नांदगाव ।** पाण्याच्या शोधार्थ भटकंती करणारे काळवीट पन्नास फूट खोल विहिरीत पडल्याची घटना गंगाधरी येथे घडली असून वन्यजीव संरक्षण संस्थेचे पदाधिकारी आणि वन विभागाच्या संयुक्त प्रयत्नाने त्यास सुखरुप बाहेर काढल्यानंतर निसर्ग मुक्त करण्यात आले. नांदगाव तालुक्यात भिषण दुष्काळाची चाहूल दिसु लागली असून चारा व पाण्याची टंचाई जाणवत आहे.

### नाशिक जिल्हा कॉंग्रेस उपअध्यक्षपदी जगताप

**नाशिक ।** दिंडोरी कृषी उत्पन्न बाजार मा. संचालक सतेच दिंडोरी तालुका कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष वाळू पाटील जगताप यांची नाशिक जिल्हा कॉंग्रेसच्या उपअध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नाशिक येथील तूपसाखरे लॉन्स येथे झालेल्या उत्तर महाराष्ट्र कॉंग्रेस विभागीय मेळाव्यात महाराष्ट्र राज्य विधानसभा विधी मंडळ नेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. वाळू पाटील जगताप यांनी या पूर्वी दिंडोरी तालुका युवक कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सोसायटीचे चेअरमन, दिंडोरी कृषी उत्पन्न समितीचे संचालक तसेच दोन ठिकाणीच्या पतसंस्थेचे संचालक व चेअरमन म्हणून काम पाहिले असून तालुक्यातील कॉंग्रेसचा एक निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून कॉंग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी जगताप यांची दखल घेवून त्यांच्यावर राष्ट्रीय कॉंग्रेसच्या नाशिक जिल्हा कॉंग्रेसच्या उपअध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविली आहे.

# नाशिकच्या निर्यातीचा टक्का वाढविण्याचा आयमाचा निर्धार

### चर्चासत्रात मान्यवरांचा सहभाग

**नाशिक । प्रतिनिधी**

पोषक वातावरणाचा लाभ उचलून नाशकातून निर्यातीचा टक्का वाढविण्यावर भर देण्याचा निर्धार अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयमा) तर्फे जिल्हाधिकारी जलज शर्मा तसेच विविध औद्योगिक संघटना आणि बँकर्सतर्फे हॉटेल कोर्टयार्ड मध्ये आयात- निर्यात धोरणावर आयोजित चर्चासत्रात व्यक्त करण्यात आला.

व्यासपीठावर जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संदीप पाटील, आयमा अध्यक्ष निखिल पांचाळ, सरचिटणीस ललित बूब, बीओटी चेअरमन ज्ञानेश्वर गोपाळे, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, जीएसटीचे उपायुक्त जगदीश डोड्डी, स्टेट बँकेचे उपमहाव्यवस्थापक राजीव सौरव, बँक ऑफ महाराष्ट्राचे क्षेत्रीय व्यवस्थापक सी.बी.सिंग, पोस्ट कार्यालयाचे उपाधिक्षक प्रफुल्ल वाणी, महाराष्ट्र चेंबरचे कांतीलाल चोपडा, संजय सोनवणे, प्रमोद चौगुले, अविनाश मराठे, आशिष नायर, संग्राम साठे, विवेक सोनवणे आदी होते.

केंद्राच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकारतर्फे आयात-निर्यात संदर्भात नवीन धोरण बनविण्याचे काम सुरू असून विविध क्षेत्रातील उद्योजकांना याबाबत काय अडीअडचणी येतात त्यावर या चर्चासत्रात उहापोह झाला. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी आपल्या भाषणात सुरुवातीला औद्योगिक क्षेत्र परिसरात शांतता प्रस्थापित करण्यास तसेच निर्यात वाढीसाठी आयमा आणि निमा या दोन्ही संस्था हातात हात घालून काम करीत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. महाराष्ट्रात निर्यातीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण आहे. नाशकातून निर्यातीचा वेग चांगला आहे. निर्यातीच्या बाबतीत नाशिक राज्यात टॉप ५ मध्ये आहे. नाशिक लवकरच टॉप ३ मध्ये कसे येईल या दृष्टीने पावले उचलण्याची गरज आहे,असेही ते पुढे म्हणाले.




**इपेक्स पॉलिक्लिनिक'चा शुभारंभ**

आयात निर्यातीबाबतच्या अडीअडचणी आणि समस्या सोडवण्यास आयमाच्या पुढाकाराने सुरू झालेल्या 'इपेक्स पॉलिक्लिनिक'चा शुभारंभ जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या हस्ते झाला.यामुळे निर्यातवाढीला मोठ्याप्रमाणात चालना मिळणार आहे.

जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संदीप पाटील यांनी निर्यात करताना येणाऱ्या अडीअडचणी आणि निर्यातीबाबतची नाशिकची स्थिती याची तपशीलवार माहिती दिली. २०२२-२३ या वर्षात २३ हजार कोटींची निर्यात करून नाशिकने या क्षेत्रात उंच भरारी घेतली आहे. भविष्यात त्यात आणखी १५.५ टक्के वाढ अपेक्षित असून त्यादृष्टीने सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली. उद्योजकांना दिल्या जाणाऱ्या विविध सवलती आणि निर्यात वाढीसाठी जिल्हा उद्योग केंद्रातर्फे सुरू असलेल्या योजनांची माहितीही त्यांनी विशद केली.

प्रारंभी आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ यांनी आयामांची भूमिका स्पष्ट केली. नाशिक जिल्ह्यातील उद्योजकांना निर्यात वाढीसाठी मोठ्या संधी आहेत. आयमाने मोठ्या प्रमाणात प्रशिक्षित निर्यात व्यवस्थापक घडवून त्यादृष्टीने पावले उचलली आहेत. निर्यात वाढीसाठी शासनातर्फे नवीन धोरणासाठी मसुदा तयार करण्यात येत असून त्यात आयमाची मोलाची भूमिका राहणार आहे. त्यासाठीच्या अडीअडचणींचे निरसन करण्यास आयमातर्फे इम्पेक्स पॉलीक्लिनिक सुरु करण्यात आले आहे. जिल्ह्याची निर्यात दुप्पट करण्याचा मानस असून यासाठी उद्योजकांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे पांचाळ यांनी सांगितले. उद्योजकांनी त्यांच्या सूचना व मागण्या लेखी स्वरूपात आयमाकडे पाठवाव्यात. त्याचा समावेश राज्याच्या निर्यात विषयक धोरणाच्या मसुद्यात करण्यास आपण शासनाला भाग पाडू,असेही पांचाळ यांनी नमूद केले.

बँक ऑफ इंडियाचे महाव्यवस्थापक राजीव सौरव तसेच बँक ऑफ महाराष्ट्रचे क्षेत्रीय व्यवस्थापक सी.बी. सिंग यांनी त्यांच्या बँकांतर्फे निर्यातीबाबत उद्योजकांना दिल्या जाणाऱ्या सुविधांची माहिती देतानाच आवश्यक ते सर्व सहकार्य सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. आयामाचे रवींद्र महादेवकर यांनी उद्योजकांच्या मागण्या व अडीअडचणींविषयी माहिती दिली. जीएसटी उपायुक्त जगदीश डोड्डी यांनी जीएसटीबाबतच्या अडीअडचणींवर उद्योजकांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. निर्यातवाढीसाठी जिल्ह्यात पोषक वातावरण आहे. कृषी क्षेत्रात नाशिक जिल्हा देशात अव्वल दहा मध्ये कसा येईल यादृष्टीने पावले उचलणे गरजेचे आहे. आवश्यकता वाटल्यास त्यासाठी कृषी सल्लागारांचाही सल्ला घ्यावा असे निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांनी सुचविले. पोस्ट खात्याचे उपाधिक्षक प्रफुल्ल वाणी यांनी पोस्ट खात्याने सुरू केलेल्या डाक निर्यात केंद्राची माहिती दिली. चेंबरचे कांतीलाल चोपडा यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रिया पांचाळ यांनी आपल्या खास शैलीत केले तर आभार आयमाचे सरचिटणीस ललित बूब यांनी मानले.

याप्रसंगी आयमाचे उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे, सुदर्शन डोंगरे, कोषाध्यक्ष राजेंद्र कोठावदे, सचिव योगिता आहेर, गोविंद झा, रवींद्र झोपे, राजेंद्र वडनेरे, मिलिंद राजपूत, जे.आर. वाघ, के.एस.सिंग, देवेंद्र विभुते, जयंत जोगळेकर, जयंत पगार, योगेश दुसाने, तुषार थोरात, नवीन पांडे, आदित्य वाशीकर, मनीष रावल, कृष्णा बोडके, दिलीप वाघ, कृतिका महाजन, कर्णसिंग पाटील, सागर देवरे, कैलास पाटील, सचिन शाह, हृषीकेश वाकडकर, धीरज वडनेरे, वीणा माजगावकर, विवेक पाटील, समीर पाटील, सुमीत बजाज, किरण आहेर, रमेश पवार, संदीप भाबड, जितेश येवले, राधाकृष्ण नाईकवाडे, निशिकांत पाटील, नीरज ब्राह्मणकर, प्रमोद वाघ, हेमंत पाटील, प्रवीण पहिलवान, संजय विधाते, राजेंद्र बोरस्ते, यतीन पटेल, हेमंत खोंड, मनोज मुळे, हरीश बावसकर, महेन्द्र बारी, मनोहर वाईकर, गौरव धारकर, हेमंत वनजरे, तुषार नांदगावकर, किरण पाटील, अभिषेक व्यास आदी आयात-निर्यात व्यवसायातील नामांकित उद्योजक उपस्थित होते.



# धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या सैय्यद रेहान अलीच्या कार्यक्रमावर बंदी घाला

### अन्यथा आंदोलन करण्याचा भाजपाचा इशारा

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी नाशिक महानगराच्यावतीने पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांची भेट घेवून नाशिक शहरात होत असलेल्या सैय्यद रेहान अली (खान) याच्या धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या कॉमेडी शो वर बंदी घालावी. आज दि.२६ रोजी नाशिक मधील लिफ कॅफे येथे कार्यक्रम होणार आहे. हा समाज कंटक सोशल मिडीयाच्या माधमातून भारतीय सैन्य (आर्मी) व हिंदु युवतींच्या नावाने आक्षेपार्ह विधान करत असून यामुळे दोन धर्मामध्ये तेढ निर्माण होऊन नाशिक शहरातील शांतता खंडीत होऊ शकते. पोलीस प्रशासनाने त्वरीत या विषयाची सखोल चौकशी करून त्याच्यावर कठोर कारवाई करून शो वर बंदी घालावी. असे लेखी निवेदन देवून मागणी केली आहे. अन्यथा भारतीय जनता पार्टी हा शो बंद पाडेल व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास प्रशासन जबाबदार असेल असा इशारा भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांनी दिला आहे.

निवेदन देताना ॲड.श्याम बडोदे, ॲड.अजिंक्य साने, अमित घुगे, देवदत्त जोशी, योगेश हिरे, रविंद्र गांगुर्डे उपस्थित होते.

# पीएम स्वनिधी योजनेतर्गत पथविक्रेत्यांनी बँकेमार्फत १० हजार रुपये कर्जाचा लाभ घेण्याचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक महापालिकेमध्ये शहरी फेरीवाल्यांसाठी केंद्र शासन पुरस्कृत 'पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी' योजना (पीएम स्वनिधी) सुरु आहे. या योजने अंतर्गत अद्यापपर्यंत प्रथम १० हजाराचे कर्ज बँकेमार्फत २०८८० पथविक्रेत्यांना रक्कम रुपये २० कोटी ८२ लाख रुपयेचे वितरण करण्यात आले आहे.


दरम्यान दुसऱ्या टप्प्यातील २० हजाराचे ५९१८ पथविक्रेत्यांना ११ कोटी ८३ लाख आणि तिसऱ्या टप्प्याचे ३९४ पथविक्रेत्यांना १ कोटी ९७ लाख असे एकूण २७,१९२ पथविक्रेत्यांना ३४ कोटी ६२ लाख रुपये वाटप करण्यात आले आहे. नाशिक मनपा कार्यक्षेत्रात व्यवसाय करत असलेले व ज्यांनी अद्यापपर्यंत पीएम स्वनिधी योजनेचा लाभ न घेतलेले असे सर्व पथविक्रते (छोटे व्यवसाय करणारे सर्व) यांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. पीएम स्वनिधी योजनेचे ऑनलाईन फॉर्म आपण राहत असलेल्या जवळच्या ग्राहक सेवा केंद्र किंवा मनपा विभागीय कार्यालय येथे जाऊन ऑनलाईन फॉर्म भरून बँकेत सादर करावा. नाशिक मनपा विभागीय कार्यालय येथे जाऊन या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन माहिती भरून घ्यावी.

# बाळासाहेब ठाकरे संग्रहालयात लवकरच सुसज्ज कलादालन

### अजय बोरस्ते यांचे प्रतिपादन

**नाशिक । प्रतिनिधी**

कलेमुळे संस्कृती टिकते, कलाकार हे शहराचे वैभव असतात, कलेच्या माध्यमातून ते इतिहास निर्माण करतात. नाशिकच्या मध्यवर्ती भागात शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे संग्रहालय आहे. तेथेच सुसज्ज कलादालन लवकरच आकाराला येईल. कलावंतांना तेथे रसिकांशी संपर्क साधण्याची संधी मिळेल. रसिकांनाही विविध कला जाणून घेऊन आस्वाद घेता येईल व कलेचे वर्तुळ पूर्ण होईल. नाशिकरोड रेल्वेस्टेशनही स्थानिक कलांचा वापर करून सुशोभीत करता येईल. असे प्रतिपादन शिवसेना जिल्हा प्रमुख अजय बोरस्ते यांनी केले. कलासंगम प्रदर्शनाच्या उदघाट्नप्रसंगी ते बोलत होते.



वारली आर्ट फाउंडेशनतर्फे लोकचित्र संगम या अनोख्या कलामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यात प्रथमच दि. १ ते ३१ ऑगस्ट दरम्यान हा आगळावेगळा उपक्रम नाशिकरोडच्या पु. ना. गाडगीळ शोरूममधील कलादालनात सुरु आहे. या मालिकेतील चौथ्या चित्रप्रदर्शनाचे उदघाट्न काल (दि.२४) करण्यात आले. भारतातील विविध वैशिष्ट्यपूर्ण लोकचित्र शैलीतील आकर्षक कलाकृतींचा समावेश त्यात असून एकूण २५ कलाकार सहभागी झाले आहेत. शाह यांनीही चित्रकारांना विविध संधी देण्याची ग्वाही दिली. स्वागत, प्रास्ताविक संजय देवधर यांनी केले. कलाकारांच्या वतीने निवेदिता पोतदार यांनी मनोगत व्यक्त केले. दि.२४ ते ३१ ऑगस्ट दरम्यानच्या या चौथ्या व शेवटच्या प्रदर्शनात पद्मजा ओतूरकर, माधवी पाठक, श्रद्धा रावळ, निवेदिता पोतदार, स्मिता गांगल, देविका काशीकर आणि संजय देवधर यांच्या विविध प्रांतातील सुंदर लोकचित्रांचा समावेश आहे.

### अज्ञात समाज कंटकाकडून नागरिकांच्या घरावर दगडफेक

**नाशिक ।** गेल्या आठ ते दहा दिवसापासून नाशिकरोड परिसरात असलेल्या मालधक्का रोड जवळील घरावर रात्रीच्या सुमारास अज्ञात समाजकंटकांकडून दगड फेकले जात असल्याने परिसरात राहणाऱ्या रहिवाशांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले असून दगडफेक करणाऱ्या टवाळखोर व समाजकंटकावर तातडीने कारवाई करावी अशी मागणी या परिसरातील नागरिक करीत आहे. नाशिक रोड परिसरात मालधक्का रोडवर असलेल्या वस्तीमध्ये गोरगरीब नागरिक राहतात. गेल्या आठ ते दहा दिवसापासून रात्री दहा ते अकरा वाजेनंतर अज्ञात समाजकंटक व काही टवाळखोर लपून छपून येतात व घरावर लहान मोठे दगड फेकत असतात, त्यामुळे घरात झोपणाऱ्या महिला व लहान मुलांमध्ये घबराट निर्माण होते.

# सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे यांनी केली मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग प्रकल्पाची पाहणी

### सप्टेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन

**पुणे । प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे यांनी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील खोपोली ते कुसगाव या लांबीतील नवीन मार्गिकेच्या (मीसिंग लिंक) प्रकल्पाच्या कामाची काल पाहणी केली.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाचे सह व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, मुख्य अभियंता राजेश पाटील, अधीक्षक अभियंता सतीश श्रावगी, कार्यकारी अभियंता अजित पाटील,

उप अभियंता विशाल भोईटे आदी यावेळी उपस्थित होते. ना. भुसे म्हणाले, यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावरील



१३.३ किलोमीटर लांबीचा 'मिसिंग लिंक प्रकल्प' हा राज्य शासनाचा महत्वकांक्षी प्रकल्प आहे. या अंतर्गत १.६७ किलोमीटर आणि ८.९२ किलोमीटर लांबीचे दोन बोगदे आहेत. या प्रकल्पाचे सुमारे ७५ ते ८० टक्के काम पूर्ण झाले असून सप्टेंबर २०२४ पर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पासाठी सुरक्षितेतच्या दृष्टीकोनातून जागतिक दर्जाच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. ही कामे करीत असतांना या विषयातील तज्ज्ञांचे वेळोवेळी मार्गदर्शन घेण्यात येत आहे. या मिसिंग लिंकवर १८० मीटर उंचीचा सर्वात उंच पूल आणि सर्वात जास्त रुंदीचा बोगदा बांधण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे लोणावळा, खंडाळा परिसरातील वाहतूक कोंडी कमी होणार असून प्रवाशांच्या वेळेत व इंधनात बचत होणार आहे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग मिसिंग लिंक प्रकल्प, नियोजित नागपूर-गोवा महामार्ग असे विविध महामार्ग पूर्ण करुन वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. राज्यातील सर्व जिल्हे द्रुतगती महामार्गाला जोडण्याचे नियोजन करण्यात येत आहे. असे अनेक प्रकल्प प्राधान्यक्रमाने कार्यान्वित होत असल्यामुळे राज्याच्या विकासाला चालना मिळते आहे असेही ना. भुसे म्हणाले.

पाहणीपूर्वी कुसगाव येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पाटील यांनी मिसिंग लिंक प्रकल्पाच्या कामाविषयी सादरीकणाद्वारे माहिती दिली.

# श्रद्धा फाउंडेशनच्या पुढाकाराने श्रवण दिव्यांगांना मिळणार मोफत श्रवण यंत्रे

### शेअर मार्केटमधील सुरक्षित गुंतवणुकीबाबत उपयुक्त माहिती

**नाशिक । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या दिव्यांग जन सशक्तिकरण विभाग अंतर्गत कार्य करणाऱ्या अली यावर जंग राष्ट्रीय वाक व श्रवण दिव्यांग जन संस्था आणि नाशिकच्या श्रद्धा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय मोफत श्रवण तपासणी शिबिर संपन्न झाले. यादरम्यान तीनशेहून अधिक ज्येष्ठ नागरिक व अडीचशेहुन अधिक विद्यार्थी यांची मोफत श्रवण तपासणी तज्ञ डॉक्टरांमार्फत संपन्न झाली.






या उपक्रमाबाबत बोलताना श्रद्धा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व भाजपा नाशिक महानगरचे सरचिटणीस सुरेश पाटील म्हणाले अशा प्रकारचा उपक्रम पहिल्यांदाच राबवला जात आहे. यामध्ये तपासणी केल्यानंतर ४० टक्केहून अधिक बधिरता असलेल्या रुग्णांचे पूर्ण कागदपत्र श्रद्धा फाउंडेशन तर्फे पुढाकार घेऊन तयार करून दिले जातील .त्यानंतर त्यांना ७००० ते १३००० रुपये किमतीचे श्रवण यंत्र मोफत दिले जाणार आहे.

या उपक्रमासाठी नाशिकमधील माई केले विद्यालयाचे १५० हून अधिक विद्यार्थी व सह्याद्री शिक्षण प्रसारक व समाज विकास मंडळ यांचे ८५ विद्यार्थी यांची देखील तपासणी करून त्यांना श्रवण यंत्र दिले जाणार आहे.

या शिबिरासाठी संस्थेचे संचालक डॉ. राजू आरख, विभाग प्रमुख डॉ राजीव जळवी यांच्या मार्गदर्शनाखाली अभिजीत शिंदे ,नवनाथ जगदाळे, पांडुरंग सावंत, कृष्णा शहा व नेमी वाधर यांनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये तपासणी केल्यानंतर ४० टक्केहून अधिक बधिरता असलेल्या रुग्णांचे पूर्ण कागदपत्र श्रद्धा फाउंडेशन तर्फे पुढाकार घेऊन तयार करून दिले जातील .



# पंचवटीत रविवारी खुली बुद्धिबळ स्पर्धा

**नाशिक । प्रतिनिधी**

मातोश्री कै. कलावती कांतीलाल छल्लाणी यांच्या स्मरणार्थ रिवरस्टोन चेस लीग १ या खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा पंचवटीतील हिरावाडी ते अमृतधाम लिंक रोडवरील रेशीमबंध बँक्वेट हॉलमध्ये रविवार दि. २७ रोजी सकाळी ९.३० वाजता सुरू होणार आहे.

ही स्पर्धा ॲड. अजित कांतीलाल छल्लाणी व परिवारातर्फे आयोजित करण्यात आली असून, या स्पर्धेतील विजेत्यांना तब्बल १ लाख ११ हजार रुपयांची रोख बक्षिसे,



तसेच ५० चषक आणि ५० पदके देण्यात येणार आहेत.

स्पर्धेत भाग घेण्यासाठी बुद्धिबळपटूंनी ९७६२४१७७०८ व ७०२०४५४६३५ या क्रमांकावर संपर्क साधावा. या स्पर्धेत जास्तीत-जास्त बुद्धिबळपटूंनी भाग घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मंत्री भुजबळ यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया शिबिराचे उद्घाटन

## पक्षवाढीसाठी सोशल मिडीयाचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन



**नाशिक । प्रतिनिधी**

राजकारणात काम करत असतांना सोशल मीडिया हे माध्यम तितकच महत्वाचं आहे. सोशल मीडिया हा राजकारणाचा अविभाज्य भाग बनला आहे. पक्षाच्या विचारसरणी जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी व पक्ष वाढीसाठी या माध्यमाचा सदुपयोग करण्याची आवश्यकता आहे, असे आवाहन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या 'उत्तर महाराष्ट्र सोशल मीडिया' शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी माजी खासदार समीर भुजबळ, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, जिल्हाध्यक्ष ॲड.रविंद्र पगार, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, कार्याध्यक्ष गोरख बोडके, प्रदेश पदाधिकारी दिलीप खैरे, बाळासाहेब कर्डक, नाना महाले, माजी आमदार जयवंतराव जाधव, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, सोशल मीडिया तज्ञ पराग पाटील, सोशल मीडिया सेलचे प्रदेशाध्यक्ष सुदर्शन जगदाळे, प्रदेश समन्वयक डॉ.कपिल झोटिंग, युवक जिल्हाध्यक्ष योगेश निसाळ, चेतन कासव, महिला जिल्हाध्यक्ष प्रेरणा बलकवडे, महिला शहराध्यक्ष योगीता आहेर, माजी नगरसेविका कविता कर्डक, सुनीता निमसे, युवक प्रदेश उपाध्यक्ष गौरव गोवर्धने, समाधान जेजुरकर, संजय खैरनार, कैलास मुदलीयर, सलीम शेख, राकेश मुंडावरे, बाळा गीते, सुरेखा निमसे, शंकर मोकळ, मनोहर कोरडे, मकरंद सोमवंशी, नदीम शेख, मीनाक्षी काकलीज, मधुकर मौले, मनोहर बोराडे, योगेश दिवे, नाना पवार, उदय सराफ यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी मंत्री छगन भुजबळ पुढे म्हणाले की, निवडणुकांमध्ये सोशल मीडिया हे अधिक प्रभावी माध्यम ठरत आहे. त्या पार्श्वभूमीवर पक्षाचा सोशल मीडिया केडर निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी ही कार्यशाळा अतिशय महत्वाची आहे. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करण्याची आवश्यकता आहे. देशातील महापुरुष, पक्षाचे नेते, पदाधिकारी यांच्या विरोधात कुणी चुकीचा संदेश पसरवित असेल तर त्याला सोशल मीडियाच्या माध्यमातून उत्तर दिलं गेलं पाहिजे. पक्षाची ध्येय धोरणे, विकासाची कामे जनतेपर्यंत पोचविण्यासाठी या माध्यमाचा प्रभावीपणे वापर करावे असे त्यांनी यावेळी सांगितले.

## न्यूज कॉलम

### बोरीस गावात आजी, माजी सैनिकांचा केला सत्कार

**बोरीस ।** कुसुंबा तालुक्यातील बोरीस येथे ग्रामपंचायतीतर्फे मेरी मिट्टी मेरा देश अभियानांतर्गत कार्यक्रम झाला. या वेळी गावातील स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबातील सदस्य व आजी - माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. या वेळी गटनेते परशुराम देवरे, पंचायत समितीच्या माजी सदस्या मीना देवरे, सरपंच सिंधुबाई माळी, उपसरपंच नारायण गिरासे, ग्रामपंचायत सदस्य कांतिलाल देवरे, कुंदनबाई बोरसे, ज्योती माळी, जितेंद्र बोरसे, कविता गायकवाड, अशोक शिंदे, राजकोरबाई पवार, माजी सैनिक मनोज माळी, भीमराव बोरसे, गोरख देवरे, मनोज राजपूत आदी उपस्थित होते. गावातून मिरवणूक काढण्यात आली.

### इसमाची आत्महत्या

**धुळे ।** निमडाळे येथील देविदास शिवाजी खोंडे (३८) यांनी फवारणीसाठी आणलेले किटकनाशक प्राशन केले. यानंतर चक्कर आणि उलट्या येवू लागल्याने त्यांना त्यांचे काका सुभाष खोंडे यांनी हिरे रुग्णालयात भरती केले उपचार सुरु असताना देविदास खोंडे यांचा मृत्यू झाला.



# शिंदखेडा येथील शिक्षण परिषदेत मीनल पाटील लिखित 'मॅथ प्रॅक्टिस बुक'चे प्रकाशन

**शिंदखेडा । प्रतिनिधी**

शिंदखेडा येथील किसान विद्यालय येथे आयोजित शिक्षण परिषदेत पाटण जि प शाळेच्या शिक्षिका मीनल पाटील व एम एच एस एस हायस्कुल शिंदखेडा येथील शिक्षक संदीप पाटील यांनी लिखित 'मॅथ प्रॅक्टिस बुक पार्ट-२' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. 'हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त आहे' असे मुख्याध्यापक जे पी पाटील यांनी आपल्या मनोगतात म्हटले तर ' या पुस्तकाची रचना व मांडणी अतिशय सोपी व सुंदर आहे', असे प्राचार्य टी एन पाटील सर यांनी भाषणात म्हटले.

'विद्यार्थ्यांच्या गुणवत्ते वाढ व्हावी म्हणून शिंदखेडा केंद्रातील सर्व विद्यार्थ्यांना हे पुस्तक अर्ध्या किमतीत उपलब्ध करून देण्याचे आश्वासन शिक्षक संदीप पाटील यांनी कार्यक्रमात दिले.या अगोदर देखील पाटील दाम्पत्याने इंग्रजी व गणित विषयाचे चार पुस्तके प्रकाशित केलेली आहेत, हे त्यांचे पाचवे पुस्तक आहे.या कार्यक्रमा प्रसंगी शि वि अ सी एस खर्डे, केंद्रप्रमुख सी जी बोरसे, एम एच एस एस हाय व ज्यू कॉलेजचे प्राचार्य टी एन पाटील सर, गर्ल्स स्कुलचे मुख्याध्यापक जे पी पाटील सर, किसान हायस्कुलचे मुख्याध्यापक एस एस पवार सर,इतर मान्यवर तसेच शिंदखेडा केंद्रातील सर्व शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते. या पुस्तक प्रकाशनाबद्दल शिंदखेडा तालुक्याचे गट शिक्षण अधिकारी डॉ सी के पाटील सर यांनी मीनल पाटील व संदीप पाटील यांचे अभिनंदन केले व ही बाब आपल्या तालुक्यासाठी अभिमानास्पद आहे असे बोलतांना सांगितले. या कार्यकर्माचे सूत्रसंचालन व आभार संदिप पाटील यांनी केले.

## पिस्तूलप्रकरणी तरुणाला कोठडी

**धुळे ।** शिरपूर मोराणे (ता. धुळे) शिवारातील उड्डाणपुलाखाली कारमध्ये लपवून ठेवलेले गावठी पिस्तूल पोलिसांनी जप्त केले. या प्रकरणी तोहीदखान फिरोजखान (रा. मोमीनपुरा, मालेगाव) याला शुक्रवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. त्याचा दुसरा साथीदार पळून गेल्याने त्याचाही पोलिस शोध घेत आहेत.

# सावळदे ग्रा.पं.सरपंचपदी आकाश देवरे आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते सत्कार

**धुळे । प्रतिनिधी**



सावळदे ता.धुळे येथील ग्रामपंचायत सरपंचपदी आकाश धनसिंग देवरे यांची निवड झाली. सरपंचपदी निवड झाल्याबद्दल धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते देवरे यांचा सत्कार करण्यात आला.

ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या निवडणूकीत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री देसले यांनी कामकाज पाहिले. नवनियुक्त सरपंच आकाश देवरे यांनी मॅकेनिकल शाखेतून बीई व एमबीए शिक्षण पूर्ण केले आहे. त्यामुळे त्यांच्या उच्च शिक्षणाचा ग्रामविकासासाठी महत्वपूर्ण उपयोग होणार आहे.सरपंच आकाश देवरे यांचा नुकताच आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते सत्कार झाला.यावेळी जि.प.सदस्य अरुण पाटील, अजबसिंग देवरे, वजेसिंग राजपूत, दगडू देवरे,जगन्नाथ देवरे, रघुनाथ देवरे, तिरसिंग राजपूत, कैलास देवरे,प्रदिप राजपूत, दशरथ देवरे, रविंद्र देवरे, योगेश देवरे, योगेश राजपूत, समाधान राजपूत, अर्जुन मोरे, मोती खाटीक आदी उपस्थित होते. नवनियुक्त सरपंच आकाश देवरे यांचे आ.कुणाल पाटील, माजी नगरसेवक विनायक शिंदे,संतोष राजपूत,लहूजी जमादार, दिनकर पाटील यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

# चिमठावळ येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**चिमठाणे ।** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिमठावळ येथे स्वांतत्र्य दिना निमित्त उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना शाखा प्रमुख राकेश पाटील यांच्या कडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

या वेळी जेष्ठ शिवसैनिक विठ्ठल पुंडलिक पाटील, लुका दत्तू मराठे, शांतीलाल रतन पाटील, ईदास दत्तू मराठे, हितेंद्र निकम, ज्ञानेश्वर ओकार पाटील, दशरथ चुडामन पाटील, आसाराम ताराचंद पाटील आदी गावातील जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

# पालकमंत्री भूसे यांच्या उपस्थितीत प्रमुख स्वयंसेवी संस्थांनी सादर केला आढावा

## बैठकीतून 'क्वॉलिटी सिटी' चा रोड मॅप ठरविण्याकरिता मिळाली चालना

**नाशिक । प्रतिनिधी**



क्वॉलिटी कॉन्सिल ऑफ इंडिया या केंद्र शासनाच्या स्वायत्त संस्थेने भारतातून नाशिकसह पाच शहरांची क्वॉलिटी सिटी याउपक्रमासाठी निवड केली असून, या उपक्रमांअतंर्गत शहराचा रोड मॅप ठरविण्याच्या दृष्टीने पालकमंत्री दादाजी भूसे यांच्या उपस्थितीत काल सोमवार रोजी महापालिका मुख्यालयात महत्वाची बैठक झाली.

बैठकीला आ. देवयानी फरांदे, आ. सीमा हिरे, क्वालिटी सिटी नाशिकचे समन्वयक जितुभाई ठक्कर, नाशिक सिटीझन फोरमचे माजी अध्यक्ष हेमंत राठी, फोरमचे संस्थापक अध्यक्ष विक्रम सारडा, आर्किटेक्ट सचिन गुळवे, रामकृष्ण आरोग्य संस्थेचे स्वामी कंठानंद महाराज, नाशिक क्रेडाईचे अध्यक्ष कृणाल पाटील, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, आयमाचे अध्यक्ष निखील पांचाळ, तानचे सागर वाघचौरे, डॉ. श्रीया कुलकर्णी, सचिन जोशी आदींसह भाजपचे महानगरप्रमुख प्रशांत जाधव, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, महानगरप्रमुख प्रवीण तिदमे, शिवसेना ठाकरे गटाचे महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे, मनपाचे माजी गटनेते गजानन शेलार आदींसह मनपा आयुक्त डॉ. अशोक करंजकर, अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, भाग्यश्री बानायत, उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, श्रीकांत पवार आदी उपस्थित होते.

क्वॉलिटी सिटी अंतर्गत सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली असून, या समितीत सहभागी झालेल्या नाशिक शहरातील ४० संस्था, मनपा व क्वॉलिटी कॉन्सिल ऑफ इडिया यांच्यात क्वॉलिटी सिटी उपक्रम राबविण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत यापूर्वीच एक सामंजस्य करार झालेला आहे. यामुळे या उपक्रमाला हिरवा कंदील मिळाल्याने त्याच्या नियोजनाच्या अनुषंगाने काल बैठकीस उपस्थित असलेल्या संस्था काय काय योगदान देणार आहे याबाबतचा रोडमॅप ठरविण्याच्या दृष्टीने पालकमंत्री दादा भूसे यांनी आढावा घेतला. सूत्रसंचालन सचिन अहिरराव तर मनपाचे जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी आभार व्यक्त केले. क्वॉलिटी सिटीअंतर्गत स्वच्छता आरोग्य, कौशल्य व स्मार्ट शिक्षण या तीन बाबींवर प्रामुख्याने लक्ष केंद्रीत केले जाणार असून, त्यानुसार गुणांकन दिले जाणार असल्याची माहिती समन्वयक जितुभाई ठक्कर यांनी दिली. यावेळी पालकमंत्री दादा भूसे म्हणाले की, सर्व संस्थांनी क्वालिटी सिटी अभियानात सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. सर्वच संस्था तसेच नाशिककरांचे क्वॉलिटी सिटी उपक्रमांसाठी योग्य सहकार्य व साथ मिळाली तर आपण नक्कीच गुणांकनापर्यंत पोहचू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### साडेचार हजार कामगारांना प्रशिक्षण

यावेळी काही संस्थांच्या प्रमुखांनी रोडमॅप कसा असेल याविषयी माहिती विशद केली. क्रेडाईचे कुणाल पाटील म्हणाले, क्रेडाईच्या माध्यमातून आतापर्यंत साडेचार हजार बांधकाम कामगारांना कौशल्य विकासचे प्रशिक्षण देण्यात आले असून, कामगारांच्या मुलांचे शिक्षण व्हावे यादृष्टीने देखील प्रयत्न केले जात आहेत. या जनजागृतीसाठी प्रत्येक प्रभागात टीम कार्यरत केली आहे. आर्किटेक्ट सचिन गुळवे म्हणाले, क्वॉलिटी सिटीअंतर्गत मनपाच्या सर्व प्रभागांमध्ये २५ जणांचे टीम तयार करून त्यामाध्यमातून आरोग्य, स्वच्छता, शिक्षणाचे महत्व पटवून दिले जाणार आहे. सचिन जोशी यांनी शहरातील एकही मुले, मुली शाळाबाह्य राहणार नाही यासाठी अभियान हाती घेण्यात आले असून, शाळेतील मदतनीस व इतर कर्मचाऱ्यांना देखील कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे सांगितले. कंपन्या तसेच उद्योगांमधील कामगार, कर्मचाऱ्यांची नोंदणी करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांनी सांगत यासंदर्भात कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी विक्रम सारडा, स्वामी कंठानंद यांनीही मनोगत व्यक्त केले.

# ट्रायथलॉन वर्ल्डकप २०२३ स्पर्धेत येवल्याच्या कृष्णा तनपुरेची चमकदार कामगिरी

### मंत्री छगन भुजबळ यांच्याकडून खेळाडू कृष्णाचा सन्मान

**नाशिक । प्रतिनिधी**

अबुधाबी दुबई येथे नुकत्याच झालेल्या ट्रायथलॉन वर्ल्डकप २०२३ स्पर्धेमध्ये येवला तालुक्यातील कृष्णा बाबासाहेब तनपुरे या खेळाडूने चमकदार कामगिरी करून कास्यपदक मिळविले. तर जागतिक चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळविले. या दोन्हीही स्पर्धांमध्ये पदक मिळविणारा तो भारताचा एकमेव खेळाडू ठरला आहे. काल राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिक येथील कार्यालयात त्याचा यथोचित सन्मान केला. यावेळी कृष्णा तनपुरे यास भावी वाटचालीस शुभेच्छा देत शासकीय मदत व नोकरीसाठी प्रयत्न करण्यात येईल असे त्यांनी यावेळी सांगितले.

येवला तालुक्यातील आडगाव रेपाळ येथील रहिवासी कृष्णा तनपुरे या खेळाडूने पॅरा ट्रायथलॉन स्पर्धेत देशासाठी पाचवेळा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व केले. तर दोन वेळा नॅशनल चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये यश मिळवीत देशाचे प्रतिनिधित्व केले. नुकत्यात अबुधाबी दुबई येथे झालेल्या ट्रायथलॉन वर्ल्डकप २०२३ स्पर्धेमध्ये त्याने चमकदार कामगिरी करून कास्यपदक तर जागतिक चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळविले आहे. या दोन्हीही स्पर्धांमध्ये पदक मिळविणारा तो भारताचा एकमेव खेळाडू ठरला आहे. तसेच चैन्नई येथे झालेल्या नॅशनल चॅम्पियनशिप स्पर्धेत त्याने सुवर्णपदक मिळविले आहे. तुर्कस्तान येथे सन २०२२ मध्ये झालेल्या वर्ल्डकप स्पर्धेत सहभाग नोंदविला. तर उजबेकिस्तान येथे झालेल्या एशियन चॅम्पियनशिप स्पर्धेत त्याने भारताचे प्रतिनिधित्व केले. तसेच डिसेंबर २०२३ मध्ये युरोप येथे होणाऱ्या स्पर्धेमध्ये तो सहभागी होणार आहे. त्यांच्या या यशाबद्दल मंत्री छगन भुजबळ यांनी त्याचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत.

# असली येथे ५० हजार वृक्ष लागवडीचे लक्ष वेगाने पूर्ण करण्यासाठी लोटला जनसागर

**शिरपूर । प्रतिनिधी**



श्री विले पार्ले केळवाणी मंडळ मुंबई संस्थेचे ट्रस्टी, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्टचे उपाध्यक्ष, शिरपूर टेक्सटाईल पार्क चेअरमन स्व. तपनभाई मुकेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त १७ ऑगस्ट २०२३ रोजी १५५ एकर क्षेत्र वर महावृक्षारोपण कार्यक्रम व स्मृती सोहळा व्यापक स्वरूपात संपन्न झाला.

५० हजार वृक्ष लागवडीचे लक्ष पूर्ण करण्यासाठी १७ ऑगस्ट रोजी पटेल परिवार व शिरपूर तालुक्यातील असंख्य पदाधिकारी नागरिक यांनी हजारो रोपे लावली तर गेल्या पंधरा दिवसात तालुक्यातील विविध शाळा १३ हजार पेक्षा जास्त लागवड झाली होती. तपनभाई फ्रेंड सर्कल, मुकेशभाई पटेल चॅरिटेबल ट्रस्ट व भूपेशभाई ग्रीन आर्मी तसेच सातपुडा संवर्धन समिती असलीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ पुढे सरसावले आहेत.

माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्टच्या संचालिका कु. द्वेता भूपेशभाई पटेल यांच्या संकल्पनेतून महावृक्षारोपण कार्यक्रम हाती घेण्यात आला असून यावर्षी ५० हजार वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे.

यावेळी आमदार काशिराम पावरा मनोगत व्यक्त करताना म्हणाले, सर्वांनी मनापासून वृक्षारोपण करून तपनभाई पटेल यांना खरी श्रद्धांजली वाहू या. शिरपूर तालुक्यावर पटेल परिवाराचे मोठ्या प्रमाणात उपकार असून त्यांनी तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला व प्रत्येक नागरिकाला न्याय देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. सर्वच क्षेत्रात मोठे काम करून भाईंनी पर्यावरण संतुलनासाठी काम केले आहे. महावृक्षारोपणाची मोहीम हाती घेतल्याने कु. द्वेता पटेल यांचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाला आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष सौ. जयश्रीबेन अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, सौ. कृतिबेन भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सौ. रीटा पटेल, कु. द्वेता भूपेशभाई पटेल, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, भाजपा प्रदेश सदस्य प्रभाकरराव चव्हाण, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष के. डी. पाटील, श्री बालाजी संस्थान उपाध्यक्ष गोपाल भंडारी, ज्येष्ठ पत्रकार सुभाष कुलकर्णी, शिरपूर पिपल्स बँक चेअरमन योगेश भंडारी, माजी नगराध्यक्षा सौ. संगिता देवरे, भाजपा शहराध्यक्ष हेमंत पाटील, कैलासचन्द्र अग्रवाल, जि. प. सदस्य बेबीताई पावरा, नगरसेविका नाजेराबी शेख, असली येथील सरपंच सरलाबाई पांडुरंग धनगर उपसरपंच रूपाली सुनील कोळी, ग्रामपंचायत सदस्य, शिरपूर पिपल्स बँक संचालक संजय चौधरी, सातपुडा संवर्धन समितीचे अध्यक्ष राहुल ईशी, लोटन कोळी, पदाधिकारी, कार्यकर्ते ग्रामस्थ तसेच विविध शाळेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, महिला, बचत गट सदस्या यांनी देखील महावृक्षारोपण सोहळ्याला उपस्थित राहून वृक्ष लागवडीचा आनंद घेतला. यावेळी कार्यक्रमात सुभाष कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त करताना मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट व भूपेशभाई पटेल ग्रीन आर्मीचे विशेष कौतुक केले.

## चांद्रयान -३ चे लँडिंग अन् घासकडवीत विद्यार्थ्यांचा जल्लोष

**धुळे ।** शहरातील घासकडवी प्रयोगिकेतर्फे चंद्रयान- ३ च्या चंद्रावरील सॉफ्ट लँडिंगचे थेट प्रक्षेपण विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. चांद्रयान-३ यशस्वीरीत्या चंद्रावर उतरल्यानंतर विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला. विद्यार्थ्यामध्ये विज्ञानाविषयी गोडी निर्माण व्हावी, संशोधनवृत्ती निर्माण व्हावी यासाठी संस्थेतर्फे विविध उपक्रम राबविण्यात येतात. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून बुधवारी (ता. २३) चांद्रयान-३ चे थेट प्रक्षेपण विद्यार्थ्यांना मोठ्या पडद्यावर दाखविण्यात आले. बेंगळुरूमधील शास्त्रज्ञांसारखाच तणाव आणि उत्सुकता विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर याप्रसंगी पाहायला मिळाली.

**पाहिजेत**

**कार्यालयीन/ऑफीस कामकाजाकरिता मराठी, इंग्रजी टंकलेखक तसेच संगणकाचे Tally,Execl, Word चे ज्ञान असलेले मुलगा/मुलगी कामकाजाकरिता तात्काळ पाहिजेत.**

: संपर्क :

**ॲड.विलास डी.झाल्टे/ ॲड.सिध्दांत व्ही.झाल्टे**

पत्ता: १५,१६ दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, स्टेशन रोड, धुळे.

मो:९१५६२६९९९९ भेटण्याची वेळ : १२ ते ६ पर्यंत

CMYK
दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्या: हेमंत पवार

## शिवसेना नाशिक पश्चिम विधानसभा शिवसेना पदाधिकारी बैठक संपन्न











नाशिक । शिवसेना नाशिक पश्चिम विधानसभा शिवसेना पदाधिकारी बैठक शिवसेना नाशिक जिल्हा पक्ष निरीक्षक हेमंत पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत काल वेदांत मंगल कार्यालय, लेखानगर, सिडको येथे संपन्न झाली. या बैठकीस शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, महानगर प्रमुख प्रविण तिदमे, उप जिल्हाप्रमुख सुदाम डेमसे, शामकुमार साबळे, शशिकांत कोठुळे, प्रमोद लासुरे, अमोल सूर्यवंशी, महेश जोशी, अमोल जाधव, माजी नगरसेविका संगीता जाधव, हर्षदा गायकर, मंदाकिनी जाधव, अस्मिता देशमाने, युवासेना विस्तारक योगेश बेलदार, जिल्हा समन्वयक सुनील वाघ, विधानसभा प्रमुख दिपक मौले, रोशन शिंदे, विधानसभा समन्वयक बबलू सूर्यवंशी, प्रकाश पवार, उप महानगर प्रमुख योगेश पाटील, आदित्य सरनाईक, अरुण घुगे, कल्पेश कांडेकर, प्रकाश दोंदे, आनंद फरताळे, प्रमोद जाधव, सागर पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख रुपेश पालकर, युवासेना महानगर प्रमुख दिगंबर नाडे, जिल्हा चिटणीस आदित्य बोरस्ते, विद्यार्थी सेना महानगर प्रमुख शुभम पाटील, युवासेना समन्वयक प्रतिक तिवारी, नरेंद्र शेखावत, अमेय जाधव, श्रावण पवार, अमोल जाधव, आकाश पवार, सनी पगार, भिवानंद काळे, दिलीप अहिरे, सनी रोकडे, विशाल साळवे, योगेश वाणी, शंतनू सौंदानकर, सरला चव्हाण, कावेरी अत्रे, आरती गायखे, योगिता चौरे, नंदा खुरणे, अश्विनी जगताप, सुमन खुळे, पुजा पाटकर, शरदचंद्र नामपूरकर आदी शिवसैनिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला शिवसेना नाशिक जिल्हा पक्ष निरीक्षक हेमंत पवार यांचा नाशिक पश्चिम विधानसभेच्या वतीने सत्कार करण्यात आला. शिवसेना महानगर प्रमुख प्रविण तिदमे यांनी पश्चिम विधानसभेची राजकीय बलाबल, भोगोलिक परिस्थिती यासंदर्भात माहिती दिली. सिडको, सातपूर, औद्योगिक वसाहत, पाथर्डी फाटा, गोविंदनगर, लेखानगर, राणेनगर, स्टेट बँक असा हा औद्योगिक कामगार असलेला, नोकरदार वर्गाचा यात समावेश असल्याची माहिती दिली.

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# पक्षवाढीसाठी सोशल मिडीयाचा प्रभावी वापर करण्याचे भुजबळ यांचे आवाहन

## नाशिक येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या 'सोशल मीडिया' शिबिराचे उद्घाटन































नाशिक । राजकारणात काम करत असतांना सोशल मीडिया हे माध्यम तितकच महत्वाचं आहे. सोशल मीडिया हा राजकारणाचा अविभाज्य भाग बनला आहे. पक्षाच्या विचारसरणी जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी व पक्ष वाढीसाठी या माध्यमाचा सदुपयोग करण्याची आवश्यकता आहे, असे आवाहन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या 'उत्तर महाराष्ट्रो सोशल मीडिया' शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी खासदार समीर भुजबळ, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, जिल्हाध्यक्ष ॲड.रविंद्र पगार, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, कार्याध्यक्ष गोरख बोडके, प्रदेश पदाधिकारी दिलीप खैरे, बाळासाहेब कर्डक, नाना महाले, माजी आमदार जयवंतराव जाधव, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, सोशल मीडिया तज्ञ पराग पाटील, सोशल मीडिया सेलचे प्रदेशाध्यक्ष सुदर्शन जगदाळे, प्रदेश समन्वयक डॉ.कपिल झोटिंग, युवक जिल्हाध्यक्ष योगेश निसाळ, चेतन कासव, महिला जिल्हाध्यक्ष प्रेरणा बलकवडे, महिला शहराध्यक्ष योगीता आहेर, माजी नगरसेविका कविता कर्डक, सुनीता निमसे, युवक प्रदेश उपाध्यक्ष गौरव गोवर्धने,मकरंद सोमवंशी, नदीम शेख, उदय सराफ यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.